# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००२१३१**

**अपिलार्थी श्री. रामशंकर सरोज**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त**
कुर्ला विभाग, कुर्ला पोलीस स्टेशन, कुर्ला (प), मुंबई-४०० ०७०

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त (परिमंडळ-५)**
सागरी पोलीस ठाणे, २ रा माळा, माहिम रेती बंदर,
माहिम डेपोसमोर, मुंबई - ४०००१६

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०४.११.२०२५</u>**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित(प्रतिनिधी)
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १७.०२.२०२३ | ०४.०३.२०२३/०१.०५.२०२३ | १५.०३.२०२३ | १९.०४.२०२३ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ०१.०६.२०२३ रोजीच्या अर्जान्वये चुकीची माहिती दिली असे कारण नमूद करुन मा. मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र या कार्यालयाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. मा. मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र कार्यालयाने सदर व्दितीय अपील दि. १८.०७.२०२४ रोजीच्या पत्रान्वये राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठाकडे हस्तांतरीत केले.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. ०४.०३.२०२३ ०१.०५.२०२३ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. १९.०४.२०२३ संलग्न केले आहेत.

२. अपिलार्थी यांनी दि. १७.०२.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:- *"सन- २०१३ पासूनच्या कालावधीची मार्गस्थ नोंद वहीमध्ये नोंद बाब संबंधित पोलीस अधिकारी यांना सुचना देण्यात आल्या आहेत या एकुण सुचना पत्राची प्रत आणि कोणत्या संबंधित अधिकारी यांना सुचना दिल्या व कोणी सुचना दिली त्यांचे नाव पद कार्यरत ठिकाणाची लेखी माहिती."*

३. जन माहिती अधिकारी यांनी दि. ०४.०३.२०२३ रोजी अपिलार्थीना कळविले की, अर्जदार यांनी मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने धारावी पोलीस ठाणेचा उपलब्ध अभिलेख तपासला असता गु. र. क्र. ४२३/२०१३ कलम ३६३, ३७६ भादविसं सह कलम ४, ८, १२ पोक्सो मधील पाहिजे आरोपी नामे देवी रामकृष्ण माळी उर्फ देवी शेख याचा शोध घेणेकरिता यापुर्वी पोलीस उपनिरीक्षक संतोष येवले व अंजली वाणी यांना आदेशित केले होते. त्यानंतर सध्या सहायक पोलीस निरीक्षक वामन ठाकरे यांना वरिष्ठ पोलीस

..२/-

निरीक्षक यांनी वरील नमुद पाहिजे आरोपीताचा शोध घेण्याचे आदेशित केले आहे. अपिलार्थींचे समाधान न झाल्याने त्यांनी दि. १५.०३.२०२३ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१९.०४.२०२३ रोजी उपलब्ध माहिती पुरविण्यात यावी असे आदेशित केले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी दि. ०१.०५.२०२३ रोजीच्या पत्रान्वये दि. ०१.११.२०२२ रोजीचे पत्र संलग्न करुन अधिकची माहिती अपिलार्थींना उपलब्ध करुन दिली.

४. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित असून अपिलार्थी यांनी आयोगास सादर केले की, जेव्हा त्यांनी दि. १७.०२.२०२३ रोजी माहिती अर्ज सादर केला होता तेव्हा त्यांना दि. ०१.०५.२०२३ रोजीच्या पत्रान्वये दि. ०१.११.२०२२ रोजीचे पत्र संलग्न करुन माहिती देण्यात आली होती व त्यांच्या मनात शंका आहे की, जेव्हा माहिती अर्ज सादर केला तेव्हा श्री. वैभव कदम तपास अधिकारी होते. जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान स्पष्ट केले की, जेव्हा अपिलार्थी यांनी माहिती अर्जसादर केला तेव्हा सदर प्रकरणात श्री. वैभव कदम हे तपास अधिकारी होते व सध्या पण तेच तपास अधिकारी आहेत.

५. या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना माहिती दिलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

प्रदीप व्यास 6-11-2025

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

State Information Commission Greater Mumbai सत्यमेव जयते

**मुंबई**
**दिनांक : ०६.११.२०२५**